मुंबई, सोमवार, दि.18 जुलै 2016.

**खडसे-दाऊद यांच्यात संभाषण नाही**

**एकनाथराव खडसेंना दिलासा**

मुंबई, दि.18 जुलै -राज्याचे माजी महसूल मंत्री एकनाथराव खडसें यांना आणखी एक मोठा दिलासा मिळाला आहे. एकनाथराव खडसे आणि दाऊद इब्राहिम यांच्यामध्ये फोनवरून कुठलंही संभाषण झालं नाही, असं ए.टी.एस. (दहशतवाद विरोधी पथकानं) मुंबई हायकोर्टाला दिलेल्या माहितीमध्ये म्हंटलं आहे.

याआधी शनिवारीच एकनाथराव खडसेंना गजानन पाटील लाचखोरी प्रकरणी एसीबीन ( लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने) क्लीन चीट दिली होती. विशेष न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्रात खडसेंच्या नावाचा उल्लेखच नाही. गजानन पाटील लाच प्रकरणी मुंबई सत्र न्यायालयाच्या विशेष एसीबी न्यायालयात, एसीबीनं आरोपपत्र दाखल केले आहे. त्या आरोपपत्रात एकनाथ खडसेंच्या नावाचा समावेश नाही.

दाऊद इब्राहिम फोन संभाषण कथित प्रकरण, गजानन पाटील कथित  लाच प्रकरण आणि पुणे एमआयडीसीतील जमीन प्रकरणी आरोप झाल्यानंतर खडसेंना राजीनामा द्यावा लागला होता. यातल्या दोन प्रकरणांमध्ये खडसेंना क्लीन चीट मिळाली आहे.

-------

-----------------

कृपया प्रसिद्धीसाठी..